


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे    अंक : ६७२. वा    शुक्रवार    दि. ०२ फेब्रुवारी २०२४    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये

# एक कोटी महिलांना लखपती दीदी करण्यात आले, निर्मला सीतारमण म्हणाल्या, ९ कोटी महिलांच्या...

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

लखपती दीदींना प्रोत्साहन दिला जाणार असून, लखपती दीदी योजनेचा आवाका दोन कोटींवरून तीन कोटींपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ९ कोटी महिलांच्या आयुष्यात बदल झाला आहे. लखपती दीदींमुळे अनेक महिला स्वावलंबी झाल्या आहेत. अंगणवाडी कार्यक्रमांना गती दिली जात आहे. आतापर्यंत एक कोटी महिलांना लखपती दीदी करण्यात आले आहेफ्फ़, असंही केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्यात. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण संसदेत अर्थसंकल्प सादर करीत आहेत. अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या, गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग रोखण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे. यासाठी लसीकरण करण्यात आले आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. मिशन इंद्रधनुषमध्ये लसीकरण वाढवण्यात येणार आहे. नवीन वैद्यकीय महाविद्यालये उघडली जाणार असून, यासाठी समिती स्थापन करण्यात येणार आहे. ९ ते १४ वर्षे वयोगटातील मुलींसाठी मोफत लसीकरण केले जाणार आहे. नॅनो डीएपीचा वापर पिकांवर केला जाईल. दुग्धविकास क्षेत्रात चांगले काम होणार असून, दुग्ध उत्पादकांना प्रोत्साहन दिले जाईल. १३६१ मंडई शी जोडल्या जाणार आ-हेत. येत्या ५ वर्षांत विकासाची नवी व्याख्या तयार करू. आशा भगिनींनाही आयुष्मान योजनेचा लाभ दिला जाणार आहे. तेलबियांवरील संशोधनाला चालना मिळेल. दर महिन्याला ३०० युनिट वीज मोफत दिली जाणार असल्याच्याही निर्मला सीतारमण यांनी घोषणा केल्या आहेत देशाची अर्थव्यवस्था योग्य दिशेने चालली आहे. आमच्या सरकारचे लक्ष पारदर्शक कारभारावर आहे. अर्थमंत्र्यांनी २० मिनिटे केंद्र सरकारच्या योजनांची गणना केली आणि भारताच्या विकासाच्या गतीवर चर्चा केली. निर्मला म्हणाल्या की, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पुढील ५ वर्षांत ग्रामीण भागात आणखी दोन कोटी घरे बांधली जाणार आहेत, असंही त्या म्हणाल्यात पंतप्रधान जन धन योजनेअंतर्गत आदिवासी समाजापर्यंत पोहोचायचे आहे. खास जमातींसाठी खास योजना आणली आहे. पायाभूत सुविधांच्या विकासाला गती मिळाली आहे. सरकारी योजना लोकांपर्यंत पोहोचत आहेत. सरकार गरिबी



हटवण्याचे काम करीत आहे. सरकारने आव्हानांचा धैर्याने सामना केला आहे. ग्रामीण विकासाच्या योजना राबविण्यात आल्या आहेत. पाणी योजनेतून प्रत्येक घरापर्यंत पाणीपुरवठा केला जात आहे. ७८ लाख पथारी व्यावसायिकांना मदत देण्यात आली आहे. शेतकऱ्यांना सक्षम करण्यावर भर देण्यात आला आहे. ४ कोटी शेतकऱ्यांना पीएम पीक विमा योजनेचा लाभ देण्यात आला आहे. पंतप्रधान किसान योजनेतून ११.८ कोटी लोकांना आर्थिक मदत मिळाली आहे. सर्वसामान्यांच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. तरुणांच्या सक्षमीकरणावरही काम केले जात आहे. तीन हजार नवीन आयटीआय उघडण्यात आल्या आहेत. ५४ लाख तरुणांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय तरुणांनी घवघवीत यश संपादन केले आहे. तिहेरी तलाक बेकायदेशीर घोषित करण्यात आला आहे. संसदेत महिलांना आर-क्षण देण्यासाठी कायदा आणला असल्याचंही निर्मला सीतारमण यांनी अधोरेखित केलंय.

# बुलढाणा जिल्ह्याचे भूमिपुत्र यांना सोपवली जिल्ह्याची कमान

## बुलढाणा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पदी आयएएस विशाल नरवाडे यांची नियुक्ती...



**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा मातृतिर्थ बुलढाणा जिल्ह्याचे सुपूत्र विशाल नरवाडे यांच्या रुपाने प्रथमच मोठी प्रशासकीय जबाबदारी या जिल्ह्यातील भूमिपुत्राला मिळाली आहे. कालच जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती भाग्यश्री विसपुते यांची बदली झाल्यानंतर, आज सायंकाळी विशाल नरवाडे यांची या जागेवर नियुक्ती झाल्याचा आदेश आला अन् त्यांनी तात्काळ म्हणजे रात्री ८.३० वाजता पदभारही स्विकारला. बुलढाणा जि.प. सीईओ विसपुते यांची संभाजीनगरला सिडको मुख्य प्रशासकीय अधिकारीपदी बदली झाल्यानंतर जिल्हा परिषदेला नवीन सीईओ म्हणून कोण येणार ? याची उत्सुकता अनेकांना लागली होती. त्याच उत्कंठेची सुखद कोंडी फुटली आज गुरुवार १ फेब्रुवारी रोजी सायंकाळी मंत्रालय सामान्य प्रशासन विभागाकडून आलेल्या नितीन गद्रे यांच्या स्वाक्षरीनिशीच्या आदेशाने.विशाल नरवाडे, भाप्रसे प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळवण व सहाय्यक जिल्हाधिकारी, कळवण उपविभाग नाशिक यांना तात्काळ मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा या पदावर श्रीमती भाग्यश्री विसपुते भाप्रसे यांच्या रिक्त जागेवर बदली झाल्याचा आदेश दिल्या गेला. तरी आपण आपल्या सध्याच्या पदाचा कार्यभार विभागीय आयुक्त नाशिक यांच्या प्रशायकीय सल्ल्याने अन्य अधिकाऱ्यांकडे सोपवून या नवीन पदाचा कार्यभार त्वरीत स्विकारण्याचे या आदेशात नमूद करण्यात आले. परिषद सीईआंचा पदभार सर्व विभागप्रमुखांच्या उपस्थितीत स्विकारला. यामुळे प्रथमच बुलढाणा जिल्ह्याचा एक युवक इतक्या मोठ्या पदावर आरुढ झाल्याचे दिसले. विशाल नरवाडे हे धाड जवळील सावळी गावाचे सुपूत्र आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण सावळी गावातील जिल्हा परिषद शाळेत, ५वी शरद पवार हायस्कूल भडगाव मध्ये तर माध्यमिक शिक्षण जवाहर नवोदय विद्यालय शेगाव येथे झाले. २०१९च्या बॅचचे ते आयएएस अधिकारी आहेत. त्याआधी २०१६ मध्ये ते आयपीएस देखील झाले आहेत. विशाल नरवाडे यांनी पदभार स्विकारताच, या बुलढाणा जिल्ह्यासाठी ऐतिहासीक कामगिरी करण्याची ग्वाही यावेळी दिली. त्यांच्या नियुक्तीने जिल्हावासीयांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नांदुरा अर्बन को-ऑपरेटिव बँक लिमिटेड मध्ये गोलमाल है भाई सब गोलमाल है! सुरुच...

**जनसंचलन/ नांदुरा**

शहरातील वादग्रस्त ठरलेली नांदुरा अर्बन को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड मध्ये सध्या ही सब गोलमाल है चाच प्रकार चालू असून अनेक बाबतीत नांदुरा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचा अध्यक्ष चंपालाल झंवर व संचालक मंडळाचा च्या समोर अनेक गैरप्रकार आले असून ही ढिम्म अध्यक्ष व संचालक मंडळ कुठल्याही प्रकारची कार्यवाही अद्याप पर्यंत तरी करताना दिसून आलेली नाही, तत्कालीन अध्यक्षांनी अनेक गंभीर स्वरूपाचे आरोप ठेवून व शोकास नोटीस देऊन ही निलंबित केलेला मुख्य कार्यकारी अधिकारी पांडेच अजूनही प्रशासकीय कामाज चालवीत असून सभासदांना माहिती न देणे धमकाविणे, पाहून घेईल चे प्रकार सध्याही करीत आहेत, तत्कालीन अध्यक्षांनी मुख्य कार्यकारी अधिकारी पांडेला निलंबित केल्यावर पांडे प्रोसिडिंग बुक घेऊन पळून गेल्याची तक्रार ही पोलीस स्टेशनला दिली होती, त्यानंतर त्या प्रकाराची बातमी दै. लोकमत, दै. भास्कर, दै. मतदार इत्यादी अनेक वर्तमानपत्रात छापून देखील आलेली आहे. नंतर तत्कालीन संचालकांनी अध्यक्षाचे आदेशाला न जुमानता परस्पर सभा घेतल्याचे सर्वश्रुत आहेच ,या प्रकरणात नवीन अध्यक्ष व संचालक मंडळाने बँकेचा हिताकरिता कार्यवाही करणे आवश्यक असताना बँकेचे अध्यक्ष चंपालाल झंवर व संचालक मंडळ बघायची भूमिका घेत असून आपली कायदेशीर कर्तव्य पार पडीत नसल्याचे दिसते येते, सहकारी कायदयाखाली नोंदणी झालेली नांदुरा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक सहकारी कायदे धाब्यावर बसत आहे, सहकार खाते जणूकाही आमच्या खिशात आहे, अशा तोऱ्यात अध्यक्ष चंपालाल झंवर संचालक मंडळ व तत्कालीन अध्यक्ष यांनी निलंबित केलेला मुख्य कार्यकारी अधिकारी पांडे वागत असून सभासदांच्या अनेक तक्रारी आल्या असून त्या तक्रारी आवक-जावक मध्ये घेतल्या जात नाही, सभासदांना माहिती तर अजूनही देण्यात आली नसून अध्यक्ष चंपालाल झंवर हे माहिती मागणाऱ्यांना सरळ आम्ही माहिती देत नाही, तुम्ही कोर्टात जा असे बोलत असून आमचे कोणी काहीही बिघडू शकत नाही, रिझर्व बँक ऑफ इंडिया व महाराष्ट्राचे सहकारी खाते आम्ही मॅनेज करत आहोत अशा प्रकारची वागणूक त्यांची आहे,

एकंदरीत अशा प्रकारच्या कार्यशैलीमुळे बँकेची प्रतिमा सभासदांमध्ये मलीन झाली असून ठेवीदारच मात्र चिंतेचे वातावरण असल्याचे दिसून येते, बँकेत नवीन ठेवी किती प्रमाणात वाढल्या की कमी झाल्या त्याची माहिती ही देण्यात येत नाही, नांदुरा अर्बन को-ऑपरेटिव बँकेत अनेक प्रकारे सभासद ग्राहकांना त्रास देण्यात येत असून अनेक सभासद कर्जदार ग्राहकांचा हा तळतळाट एक दिवस या बँकेला भगवा लागेल एवढे निश्चित,

कर्जदारांच्या कोऱ्या स्टॅम्प पेपरवर, कोऱ्या अर्जावर, कोऱ्या कागदावर सह्या घेण्यात येत असतात, नंतर त्या कागदावर चा त्रास दुरुपयोग करून सभासद कर्जदारांना त्रास देऊन असल्याचा अनेक तक्रारी करीतआहेत, नांदुरा अर्बन को-ऑपरेटिव बँकेचे अध्यक्ष चंपालाल झंवर हे अजूनही बँकेत कोणत्या दिवशी किती वाजेपर्यंत हजर असतात याची माहिती नोटीस बोर्डावर देण्यात आली नाही, अध्यक्ष चंपालाल झंवर हे कुठल्याही प्रकारच्या सभासद ग्राहकांच्या समस्या अडचणी सोडत नसल्याचा अनेक त्रस्त ग्राहक सभासद बोलतात हा फक्त मानापुरता व लेटरहेड पुरता मोठेपणा मिरवण्यासाठी अध्यक्ष झाला असा बिनकामाचा अध्यक्ष असल्याचा अशी प्रतिक्रिया अनेक सभासद ग्राहक तीव्र शब्दात व्यक्त करतात, अशा प्रकारच्या अध्यक्ष करून नवीन संचालक मंडळ देखील खाजगीत नाराजी व्यक्त करतात, संबंधित अध्यक्ष चंपालाल झंवर यांच्या कार्यकाळात हा फक्त दोन वर्षाचा असल्याचा समजते, परंतु सहा महिन्यातच अध्यक्ष चंपालाल झंवर यांच्या विरोधात संचालकांमध्ये नाराजी असून या नाराजीचा परिणाम अविश्वास ठरावात देखील होऊ शकतो, असे दोन-तीन जेष्ठ संचालक बोलले असल्याचे समजते म्हणजे अध्यक्ष




चंपालाल झंवर यांचे कार्यशैलीमुळे सर्वच स्तरावरून त्यांच्यावर रोष असल्याचे दिसून येते तरी खुर्चीला किती दिवस अध्यक्ष चिटकून राहतात की खुर्ची सोडतात हे लवकरच येणारा काळ ठरवेल,(क्रमशः)

नांदुरा अर्बन बँक लिमिटेड नांदुरा मध्ये अनेक वादग्रस्त निर्णय घेतले जात असून सभासदांना माहिती न देणे तक्रार अर्ज न घेणे मनमानी प्रमाणे कामकाज चालविणे असे प्रकार आणि नित्याचेच झाले असून नांदुरा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेत बदल्यांमध्ये देखील पक्षपात झाला असल्याचे बोलले जात आहे,

नांदुरा अर्बन को-ऑपरेटिव बँक लिमिटेड नांदुरा मध्ये प्रशासकीय कामकाजास्तव झालेल्या बदल्या मध्ये मनमानी झाली असून काही कर्मचाऱ्यांना नांदऱ्यातून अडचणीच्या ठिकाणी पाठविण्यात आले तर आपल्या मर्जीतील कर्मचाऱ्यांना मात्र हलविण्यात आलेले नाही,

नांदुरा अर्बन को-ऑपरेटिव बँकेतील काही कर्मचारी वर्षानुवर्ष एकाच ठिकाणी काम करीत असून फार तर जळगाव ,खामगाव, मलकापूर अशी अपडाऊन करता येऊ शकणाऱ्या ठिकाणी बदली करण्यात आलेली आहे, अध्यक्ष चंपालाल झंवर या बदल्याबाबत जाहीरपणे लेखी माहिती देतील काय? बदल्यानबाबत कोणते निकष नियम लावण्यात आले व कोण त्यास पात्र होते,किंवा कसे समजल्यास बरे होईल,

# वास्तविक दिव्यांगांची पुन्हा तपासणी करा यासह विविध मागण्यांचे जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदन

**जनसंचलन/बुलडाणा**

बुलढाणा जिल्ह्यामध्ये केंद्र सरकारच्या युडिआयडी प्रणाली तपासणीमध्ये वास्तविक दिव्यांगावर अन्याय होत असल्याचे दिसुन आले आहे याविषयी त्यांना पुन्हा तपासणी करत प्रमाणपत्र मिळावे यासाठी विराट मल्टीपर्पज फाऊन्डेशन च्यावतिने विविध मागण्यांचे निवेदन त्यामध्ये १ आपल्या जिल्ह्य अंतर्गत खामगाव/बुलढाणा येथे बुधवारी व शुक्रवारी दिव्यांग तपासणी शिबीर घेण्यात येते त्यामध्ये वास्तविक असलेल्या दिव्यांगाना प्रमाणपत्र न मिळाल्याने त्यांना सरकारच्या सेवा सुविधांच्या योजनेपासून मुकावे लागत आहे त्या करिता त्यांची रीतसर पुन्हा तपासणी विशेष दिवस ठरवीत करण्यात यावी २ न्यूरोसर्जन नसल्याने आपल्या जिल्ह्यातील मेंदू आजाराचे रुग्ण दिव्यांग प्रमाणपत्र पासून वंचित



आहे त्या करिता न्यूरोसर्जन नियुक्त करण्यात यावे ३ दिव्यांग बोगस प्रमाणपत्र धारक यांच्यावर दिव्यांग सुरक्षा हमी कायद्यानुसार कठोर कार्यवाही करण्यासाठी त्यांची खुली चौकशी (तपासणी) करण्यात येऊन कार्यवाहीची पुर्तता करावी (२) ४ आपल्या जिल्ह्यात बोगस कार्डधारक प्रवास सुविधा घेत आहेत त्यामुळे परिवहन सेवेची लुट होत आहे त्यामुळे अश्या बोगस प्रवासी वर कार्यवाही करण्यात यावी अश्या मागणीचे निवेदन विराट मल्टीपर्पज फाऊन्डेशन या दिव्यांग सेवाभावी संस्थेच्यावतिने खामगाव प्रहार शहराध्यक्ष क्षत्रुधन ईंगळे विनोद पवार यांनी सादर केले सदर निवेदनाच्या प्रती राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,दिव्यांग कल्याण विभाग अध्यक्ष नामदार बच्चु कडु,परिवहन मंत्री व आरोग्यमंत्री यांना सादर केल्या आहेत

# नाट्य अभिवाचन स्पर्धेत बुलढाण्याचा संघ विभागात प्रथम

**जनसंचलन/बुलढाणा**

नाट्यजागर महोत्सवात अकोला येथे २९ जानेवारी रोजी पार पडलेल्या नाट्य अभिवाचन स्पर्धेत बुलढाणा येथील अक्षरदेह नाट्य कला केंद्राच्या संघाने अकोला विभागात प्रथम क्रमांक मिळवला आहे. अ. भा. मराठी नाट्य परिषदेच्या शंभराव्या नाट्यसंमेलनानिमित्त आयोजित नाट्यजागर महोत्सवात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

अकोला येथील श्रीमती एल. आर. टी. वाणिज्य महाविद्यालयाच्या सभागृहात २९ जानेवारी रोजी नाट्य अभिवाचन स्पर्धा घेण्यात आली. अकोला, बुलढाणा व वाशिम जिल्ह्यातील संघांची अकोला केंद्रावर नोंदणी करण्यात आली होती. यामध्ये बुलढाणा येथील अक्षरदेह नाट्यकला केंद्राच्या संघाने शशिकांत इंगळे लिखित मी काहीही विसरलेलो नाही या दोन अंकी नाटकातील प्रवेशाचे अभिवाचन केले. यामध्ये नाट्यकलावंत सौ. सुवर्णा कुलकर्णी पावडे, गणेश राणे, संतोष पाटील व शशिकांत इंगळे



यांचा सहभाग होता. स्पर्धेचे परीक्षण सुप्रसिद्ध रंगकर्मी अरुण घाटोळे व माजी महापौर तथा रंगकर्मी सौ. अश्विनी हातवळणे यांनी केले. स्पर्धा प्रमुख तथा अ. भा. मराठी नाट्य परिषद अकोला-मलकापूर शाखेचे कार्यवाह अशोक ढेरे यांनी निकालाचे वाचन केले. अक्षरदेह नाट्यकला केंद्र बुलढाणाच्या संघाला परीक्षकांच्याहस्ते तीन हजार रुपयांचा धनादेश व उपांत्यफेरीसाठी निवड झाल्याचे प्रमाणपत्र देऊन प्रथम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. स्पर्धेला जेष्ठ रंगकर्मी मधू जाधव, सचिन गिरी, विष्णू निंबाळकर, डॉ. सुमेधा हर्षे, डॉ. शिरीन देशमुख, श्रीकांत सोवळे यांच्यासह बहुसंख्य रंगकर्मी व रसिक उपस्थित होते.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नवमतदारांनी मतदार नोंदणीसाठी पुढाकार घ्यावा -जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

## लोकसभा निवडणुकीसाठी नोंदणी करण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्यात येत्या कालावधीत लोकसभा आणि विधानसभेसाठी निवडणूक होणार आहे. यात मतदान करण्यासाठी नवमतदारांना अद्यापही संधी आहे. यासाठी नवमतदारांनी पुढाकार घेऊन मतदार नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी, नुकत्याच झालेल्या मतदार याद्यांच्या अद्ययावतीकरणामध्ये नवमतदारांनी नोंदणीसाठी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आहे. त्यामुळे नवमतदारांच्या नोंदणीत लक्षणीय वाढ झाली आहे. दि. १ जानेवारी २०२३ ते ५ जानेवारी २०२४ या कालावधीत एकूण १ लाख ५ हजार ८८४ नवीन मतदारांनी नोंदणी केली आहे. मागील कार्यक्रमामध्ये १८ ते १९ या वयोगटामध्ये १९ हजार ५९ मतदारांची नव्याने भर पडली आहे. प्रारूप यादीत १८ ते १९ या वयोगटाची मतदारसंख्या ६ हजार ११८ होती. ती २३ जानेवारीच्या अंतिम मतदार यादीत २५ हजार ९७७ इतकी आहे. तसेच २० ते २९ या वयोगटात २७ हजार २६ मतदारांची वाढ झाली आहे. तसेच प्रारूप यादीतील मतदार संख्या ३ लाख ७७ हजार ७४१ होती, ती अंतिम यादीत ४ लाख ४ हजार ७६७ इतकी झाली आहे. तहसिल आणि मंडळस्तरावर प्रत्येक बुधवारी मतदार नोंदणीसाठी विशेष शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे, तसेच विविध जनजागृतीपर उपक्रम राबवून मतदारयादीमध्ये पात्र मतदारांची नोंदणी करण्यात आली आहे. गेल्या पुनरीक्षण कार्यक्रमात दि. १ ऑक्टोबर २०२४ या तारखेस १८ वर्षे पुर्ण करणाऱ्या युवकांना पूर्व नोंदणी करता आली. ही प्रक्रिया अद्यापही सुरू असल्याने युवकांनी नाव नोंदणी करावी. मतदारयादीत नाव नसलेल्या नागरिकांनी नमुना ६ भरून आपला मताधिकार सुनिश्चित करावा, तसेच सर्व राजकीय पक्षांनीही पक्षामार्फत मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींच्या नियुक्त्या



करून त्यांच्या माध्यमातून मतदारांना यादीत नाव तपासण्यास आणि नावे नसलेल्यांना मतदार नोंदणीस साहाय्य करावे. नागरिकांना मतदार नोंदणी कार्यालयात प्रत्यक्ष मतदार नोंदणी करता येणार आहे, तसेच मतदाता सेवा पोर्टल आणि वोटर हेल्पलाइन ॲपवर ऑनलाइन नाव नोंदणीची सुविधा सुद्धा उपलब्ध आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अंतिम मतदारयादीमध्ये मतदारांनी आपले नाव समाविष्ट असल्याची खात्री करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले आहे.

# जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात मानधनावर पदभरती...




**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात माजी सैनिक प्रवर्गातून तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर कत्रांटी पध्दतीने पदे नियुक्त करण्यात येणार आहे. यात सभामंडप मॅनेजर १ पद फक्त माजी सैनिक, सफाई कर्मचारी १ पद माजी सैनिक, सिव्हिलियन यातून भरण्यात येणार आहे. या पदाकरीता इच्छुक सैन्यदलातील सेवानिवृत्त झालेल्या आणि पात्रता पूर्ण करत असलेल्या जिल्ह्यातील माजी सैनिकांनी आपले अर्ज तात्काळ दि. ९ फेब्रुवारीपर्यंत आपल्या डिस्चार्ज बुक, पीपीओ, ओळखपत्र, एम्लायमेंट कार्ड व वैयक्तिक अर्जासह जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात अर्ज सादर करावेत. सभामंडप मॅनेजर पदासाठी शिक्षण दहावी पास, सैन्य दलातील हुद्दा जेसीओ, तर मासिक मानधन हे २४ हजार ७९ रूपये राहणार आहे. सैन्य दलातील चारित्र्य हे कमीत कमी गुड, मेडिकल कॅटेगिरी शेप-१, वयोमर्यादा ५८ वर्षापर्यंत असावे. महाराष्ट्र शासनाचे एमएससीआयटी प्रमाणपत्र, मराठी व इंग्रजी टंकलेखनाचा वेग दर मिनिटास किमान ४० शब्द पद असावे लागणार आहे. सफाई कर्मचारी पदासाठी शिक्षण दहावी पास, वयोमर्यादा ६० वर्षापर्यंत असून मासिक मानधन ११ हजार ८६९ रूपये राहणा आहे.

# विकासाचा आभास निर्माण करणारा अर्थसंकल्प - जयश्रीताई शेळके

**जनसंचलन/बुलडाणा**

विकासाचा आभास निर्माण करणारा हा अर्थसंकल्प आहे. महिला, शेतकरी, युवक, व्यावसायिकांसाठी कुठलीच ठोस तरतूद यामध्ये नाही. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतीबाबत आणि शेतकऱ्यांसाठी या अर्थसंकल्पात विशेष काहीच नाही. अशी प्रतिक्रिया जयश्रीताई शेळके, सचिव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस यांनी दिली. पुढे बोलतांना त्या म्हणाल्या की, एकीकडे खते, बियाणे, औषधांच्या किंमती वाढत आहे. दुसरीकडे शेतीमालाचे दर प्रचंड खाली घसरले आहेत. व्यावसायिकांचे कंबरडे या अर्थसंकल्पाने मोडले आहे.



तर व्यावसायिक सिलिंडर १४ रुपयांनी महाग झाले आहे. तुटपुंज्या मानधनावर काम करणाऱ्या अंगणवाडी सेविकांना आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करावे लागते. परंतु त्यांच्यासाठी सुद्धा या अर्थसंकल्पात कोणतीच तरतूद केलेली नाही. केवळ आकड्यांचा खेळ करुन लोकांना भुलवण्याचे काम शासन करीत आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# लोकशाही दिनाचे सोमवारी आयोजन...

**जनसंचलन/बुलडाणा**

फेब्रुवारी महिन्याचा जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार, दि. ५ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. तक्रारदारांनी लोकशाही दिनी उपस्थित राहावे, उपस्थित राहणे शक्य नसल्यास




तक्रारी रजिस्टर पोस्टाने लोकशाही दिनाआधी जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचतील अशा पाठवाव्यात, असे निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांनी कळविले आहे.

# राजर्षी शाहू ग्रामीण पतसंस्थेच्या कुऱ्हा काकोडा शाखेचा शुभारंभ...

## राजर्षी पे क्यूआर कोडचे वाटप...

**जनसंचलन/मुक्ताईनगर**

राजर्षी शाहू ग्रामीण सहकारी पतसंस्थेच्या कुऱ्हा काकोडा (ता. मुक्ताईनगर) शाखेचा शुभारंभ ३१ जानेवारी २०२४ रोजी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब शेळके यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी राजर्षी पे क्यूआर कोडचे वाटप करण्यात आले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि महानायिकांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी अभिता कंपनीचे सीईओ तथा सत्यशोधक चित्रपटाचे निर्माता सुनील शेळके, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सचिव जयश्रीताई शेळके, गणेश रिंढे, कुऱ्हा सरपंच बी. सी. महाजन, निवृत्ती पाटील, अंबादास पाटील, विशाल खोले, गणेश थेटे पाटील, नितीन महाराज, मध्य प्रदेश मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष सुनील महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलतांना भाऊसाहेब शेळके म्हणाले की, राजर्षी शाहू पतसंस्थेच्या माध्यमातून शेतकरी,




कष्टकरी, व्यावसायिक, मजूर, वंचित घटकांना पाठबळ देण्याचे काम करण्यात आले आहे. भविष्यातही पतसंस्थेची सामाजिक दायित्वाची भूमिका कायम राहील. संस्थेच्या आतापर्यंतच्या वाटचालीत ठेवीदार, सभासद, खातेदार यांचे मोठे योगदान असल्याचे सांगून राबवण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांची महिती दिली. जयश्रीताई शेळके यांनी राजर्षी शाहू पतसंस्थेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी बचतगट चळवळीस आर्थिक पाठबळ देण्याची भूमिका भविष्यातही कायम राहील, अशी ग्वाही दिली. कार्यक्रमाला योगेश दालमिया, दिनेश कदम, विनोद सोनवणे, ज्ञानदेव ढगे, नितीन उमाळे, रामराव पाटील, संजय पाटील, मुन्ना बोंडे, कादिर शहा, विलास चिंचोळकर, अनंता पाटील, शिवा पाटील, बाबू पाटील, नारायण दाणे, मनोहर निंबाळकर, दशरथ काकडे, दिनेश जैस्वाल, विजय दुट्टे, शक्ती पवार, एस. बी. पाटील, मनोज वाघ, स्वप्नील देशमुख, धनंजय बाहेकर, भागवत गव्हाणे, राजीव शेळके यांची उपस्थिती होती. संचलन योगेश महाजन यांनी केले तर आभार पल्लवी पाटील यांनी मानले.

# आता राज्यसभेत मागच्या दारातून येण्याचा प्रयत्न करतील; उद्धव ठाकरेंचा सुनील तटकरेंवर निशाणा

वृत्तसंस्था/रायगड

जिल्हा दौऱ्यावर आलेले पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सुनील तटकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. यावेळी रायगड लोकसभा मतदारसंघात या वेळेला मला वाटत नाही जास्त काही प्रचार करण्याची गरज आहे. कारण गेल्या वेळेला रायगडने ताठ मानेने मोदींविरोधात त्यांनी मतदान केलं होतं. यावेळेला प्रचंड त्सुनामी आल्यासारखं मतदान रायगडमध्ये मोदींच्या विरोधात हुकूमशाहीच्या विरोधात मतदान होणार आहे, असे ते म्हणाले आहेत. रायगड जिल्हा दौऱ्यात त्यांनी मोदी, भाजपा या मुद्द्यावरून टीका करत तटकरे यांनाही लक्ष केलं आहे. मागच्या वेळेला शिवसेनेचे कार्यक्रमासाठी आले असताना मी शरद पवार यांच्या शेजारी बसलो होतो. त्या वेळेला त्यांनी मला सांगितलं की, या गद्दाराला गाडायचं असं सांगत थेट विद्यमान खासदार सुनील तटकरे यांच्या विरोधात ठाकरेंनी रणशिंग फुंकलं आहे. घराणेशाहीच्या मुद्द्यावरून त्यांनी खासदार सुनील तटकरे आणि मंत्री आदिती तटकरे यांनाही ठाकरे यांनी लक्ष केलं आहे.निवडून दिलेल्या खासदाराला आदिती तटकरे यांना भाजपने जाहीर करावं की यांना आम्ही तिकीट देणार नाही. कारण ही घराणेशाही आम्ही बंद करणार. हिम्मत असेल तर विरोध करा, असं थेट आव्हानच उद्धव ठाकरे यांनी दिलं आहे. ना राज्यसभेत पाठवणार ना विधानसभेत पाठवणार. कारण अशी ही कुजबुज आहे, त्यांना आता कळलं आहे की लोकसभेत निवडून येऊ शकत नाही. मग मागच्या दारातून पुन्हा तटकरे राज्यसभेवर जाण्याचा प्रयत्न करतील. त्यांना मोदींनी सांगायला हवे गेट आउट मला घराणेशाही चालणार नाही, असं ठाकरे म्हणाले आहेत.उद्धव ठाकरे म्हणाले की, पालकमंत्री वगैरे काही असेल तर तू आणि तुझी मुलगी घरी काय ते करा. पक्षात स्थान नाही. ही घराणेशाही बाहेर काढा, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी तटकरे आणि भाजपला सुनावलं आहे. रायगड जिल्हा मोदी लाटेत गेल्यावेळी वाहून गेला नव्हता. मात्र आता जो निवडून आला तो मोदी लाटेत वाहून गेला. पण माझा रायगड तसाच आहे आणि आता रायगडकर खूश झाले आहेत. कारण त्यांना जे पटलं नव्हतं ते त्यांनी गेल्या वेळेला केलं होतं. आता तर आपण केवळ मोदींच्या विरोधात नाही तर हुकूमशाहीच्या विरोधात उभे राहिलो आहोत, असे शब्दात त्यांनी सुनील तटकरे यांच्याबरोबरच भाजपचाही समाचार घेतला आहे.ठाकरे यांनी अजित पवार यांच्यावरही निशाणा




साधत भ्रष्टाचार करा भाजपात या, क्लीन चिटची मोदी गॅरंटी आहे, असं म्हणत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही निशाणा साधला. या वेळेला गीते साहेबांनी ही माझी थोडी पंचायत केली. उद्धव ठाकरे पुन्हा मुख्यमंत्री होणार सांगत मी पंतप्रधान पदाचा स्वप्न बघू की नको असाही मला प्रश्न पडला आहे, असं मिश्किलपणे सांगत मला कोणत्याही पदाची स्वप्न पडत नाहीत. पडली ही नव्हती मला फक्त दिसतो आहे तो माझा महाराष्ट्र, माझा देश आणि माझी भारत माता, अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

# २ फेब्रुवारीला शेगाव येथे पंडित दीनदयाल उपाध्याय विभागीय रोजगार मेळावा...

## २३ कंपन्या सहभागी होणार ;१२२७ पदांसाठी भरती

जनसंचलन/बुलढाणा

नोकरीच्या शोधात असलेल्या सुशिक्षित बेरोजगार तरुणाईला स्थानिक तसेच इतर विभागातील नामवंत खासगी कंपन्या, कारखाने आणि उद्योगसमूहांच्या माध्यमातून चांगल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याचे उद्देशाने कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, विभागीय आयुक्तालय, विद्यार्थी विकास विभाग, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि श्री. संत गजानन महाराज अभियांत्रीकी महाविद्यालय, शेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २ फेब्रुवारी २०२४ रोजी श्री. संत गजानन महाराज अभियांत्रीकी महाविद्यालय, शेगाव, जि. बुलडाणाय येथे विभागीय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात विविध क्षेत्रातील २३ कंपन्या, उद्योगसमुह, कारखाने यांच्या आस्थापनेवरील सुमारे १ हजार २२७ कुशल, अकुशल रिक्त पदांसाठी रोजगारभरती होणार आहे. या सुवर्ण संधीचा अमरावती विभागातील सुशिक्षीत बेरोजगार युवक-युवतींनी घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता उपायुक्त द. ल. ठाकरे यांनी केले आहे.

या रोजगार मेळाव्यात विविध नामांकित कंपन्या सहभागी होणार असून त्यात जीनस इन्फ्रा प्रा.लि.,पिपल ट्री व्हेंचर प्रा.लि., ए.जी.एस इंशुरन्स, पेटीएम, जाधव ग्रुप ऑफ कंपनी, लक्ष्मी अग्णी कंपनी प्रा.लि.,सहयोग मल्टीस्टेट क्रेडीट सो. ली., नवभारत फर्टीलायझर, टॅलेनसेतू प्रा.लि.,सी.ए.जी.एल, एल.आय. सी., कल्पतरु स्कील डेव्हलपमेंट अकॅडमी, इलेगन्ट कोटींग प्रा.लि.,हेंड मोटर्स एल.एस.पी.प्रा.लि., पीएनबी मेटलाईफ इंडिया इंशुनन्स प्रा.लि., पियाजिओ व्हिकल्स प्रा.लि.बारामती, अलाईड रिसोस मॅनेजमेन्ट सर्विस प्रा.लि. पुणे, धुत ट्रान्समिशन प्रा.लि. छ.संभाजीनगर, टॅलेंट सेतू, पुणे, परम स्किल ट्रेनिंग इंडिया प्रा.लि. छ.संभाजीनगर, पिपल ट्री व्हेचर्स प्रा.लि. नागपूर आदी २३ नामांकित कंपन्या मार्फत रिक्त पदे भरली जाणार आहेत. या रोजगार मेळाव्यात दहावी, बारावी, आयटीआय, इंजिनिअरींग,




पदवी, पदव्युत्तर, पदविका तसेच इतर व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण केलेले रोजगार इच्छुक उमेदवारांना रोजगार मेळाव्याच्या ठिकाणी मुलाखती देवून रोजगाराचा लाभ घेता येईल. अमरावती विभागातील युवक-युवतींना नोकरीच्या संधी मिळवून देण्याच्या उद्देशाने जास्तीत जास्त उमेदवारांना रोजगार मेळावा मधून नोकरी देण्याचा प्रयत्न करण्यात येतो. त्याचाच भाग जागेवरच निवड मोहीमेच्या (ऑन स्पॉट सिलेक्शन) माध्यमातून विविध उद्योजकांना आवश्यक असणाऱ्या वेगवेगळ्या पात्रतेच्या पदाकरिता कंपन्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहून उमेदवारांच्या थेट मुलाखती घेतील व मुलाखत देऊन पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना लगेचच नोकरीची संधी मिळेल.

# लकी सानंदा एज्युकेशनल शावरमध्ये हुतात्मा दिवस साजरा

जनसंचलन/ खामगाव

स्थानिक राणा लकी सानंदा एज्युकेशनल शावर मध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी पुण्यतिथी आपण हुतात्मा दिन म्हणून साजरा करतो. यावेळी शालेय अध्यक्ष राणा अशोककुमार सानंदा, प्राचार्य अरविंद स्वामी, शिक्षकवृंद व विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. यावेळी प्रथम मान्यवरांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन केले. यावेळी शिक्षिका पुनम गिरी, वैष्णवी पिंपळेकर, स्वाती बोचरे, मृणालीनी तेलगोटे आणि पालक प्रतिनिधी डॉ. अश्विनी राठोड यांनी महात्मा गांधीच्या कार्याची गाथा सांगीतली. महात्मा गांधीनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक सत्याग्रह केले, १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळवून दिले. त्यांची पुण्यतिथी आपण हुतात्मा दिवस म्हणुन पाळतो. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन प्राचार्य अरविंद स्वामी यांचे मार्गदर्शनाखाली शिक्षकांनी यशस्वी केले. कार्यक्रमाचे संचालन आभार शिक्षिका वैष्णवी पिंपळेकर यांनी मानले.

